महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

===========================================================================

जा.क्र.तंशिविकापू/विवि/२०२०/ ३२११ दिनांक : १३/१०/२०२०

अत्यत महत्वाचे /कालमर्यादित

प्रति,

संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या,
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या,
सर्व पदवी व पदव्युत्तर संस्था. (पुणे विभाग)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संस्थांची माहिती /प्रवेश क्षमता मंजूरी बाबत...**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र २ अ/एडीएम/२०२०/१८८ दि ३०/०४/२०२०
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र २ अ/एडीएम/२०२०/१८९ दि ३०/०४/२०२०
३. या कार्यालयाचे पत्र क्र शा.प्र.तंशिविकापू/विवि/२०२०/२४२४ दिनांक २०/०८/२०२०

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रे या कार्यालयास प्राप्त झाली असून .सदर पत्राच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षासाठी सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येत असून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांना शिखर परिषदांची मान्यता, संचालनालयाची मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन ती पडताळणी करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये यापूर्वी कळविले आहे.

या विभागीय कार्यालयाच्या लॉगीन मध्ये संस्थांकडून प्राप्त झालेल्या माहितीची पडताळणी करण्यात आली असून ज्या संस्थांनी अपूर्ण कागदपत्रे अथवा चुकीची प्रवेशक्षमता अपलोड केली आहे. अशा संस्थांची माहिती दुरुस्ती करीता / आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याकरीता संस्थांच्या लॉगीन मध्ये परत पाठविण्यात आली आहे. (unconfirm) अशा संस्थांची यादी सोबत जोडली असून, यादीतील सर्व संस्थांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करुन माहिती **दिनांक १३/१०/२०२० सायंकाळी ५:०० वाजे पर्यत पुनःश्च सादर करावी. सदरची मुदत ही अंतिम असून यामध्ये कुठल्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही याची गंभीर्याने नोंद घ्यावी तसेच माहिती मध्ये कोणत्याही प्रकारची चूक असणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. वरिष्ठ कार्यालयाने सदरची लिंक बंद केल्यास संस्थेच्या अभ्यासक्रमांना या कार्यालयाद्वारे मान्यता देता येणार नाही सबब सदर संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेशप्रक्रीयेमध्ये करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

**तसेच ज्या संस्थांची प्रवेशक्षमता व माहिती या कार्यालयाने तपासून मंजूर केली आहे अशा संस्थांनी सदर मंजूर केलेल्या माहितीची पडताळणी करावी व शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ करीताची मंजूर प्रवेशक्षमता बिनचूक असल्याची खात्री करावी . मंजूर केलेल्या प्रवेशक्षमतेमध्ये दुरुस्ती असल्यास तात्काळ या कार्यालयाशी प्रत्यक्ष दूरध्वनीद्वारे (श्री एस.बी.शिंदे (प्रोग्रामर)) यांच्याशी ०२०-२५६५६२३४ विस्तारीत क्रमांक २०६ वर संपर्क साधून आवश्यक ती दुरुस्ती करुन घ्यावी.**

आपल्या संस्थेने भरलेल्या माहितीच्या आधारे केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेकरीता प्रवेशक्षमता निश्चित करण्यात येणार असल्याने व सदरची माहिती प्रवेशासंबधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व तातडी लक्षात घेवून प्रवेशक्षमतेबाबतची माहितीच्या अचूकतेबाबत योग्य दक्षता घेण्यात यावी. संस्थेने चुकीची माहिती भरल्यास व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी उद्भवल्यास, त्यास संबधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

## List Of Institute Unconfirmed By RO

| Sr.No | Institute Code | Institute Name |
|---|---|---|
| 1 | 6737 | Prin. K.P. Mangalvedhekar Institute Of Management Career Development And Research, Solapur |
| 2 | 6276 | MKSSS's Cummins College of Engineering for Women, Karvenagar,Pune |
| 3 | 6426 | People Enpowerment Group,International School of Business & Media, Mulshi. |
| 4 | 6271 | Pune Institute of Computer Technology, Dhankavdi, Pune |
| 5 | 6270 | Rayat Shikshan Sanstha's Karmaveer Bhaurao Patil College of Engineering, Satara |
| 6 | 6912 | Flora College of Architecture, Khopi |
| 7 | 6788 | Pune Vidyarthi Griha's College of Engineering and Technology and G.K.Pate,(Wani) Institute of Management, Pune |
| 8 | 6818 | Satish Misal Educational Foundation's BRICK school of Architecture, Pune |
| 9 | 6959 | Tatyasaheb Kore College of Architecture, Warnanagar |
| 10 | 6274 | Pune Vidyarthi Griha's College of Engineering and Technology and G K Pate(Wani) Institute of Management, Pune |
| 11 | 6257 | Rajgad Dnyanpeeth's College of Pharmacy, Bhor |
| 12 | 6652 | Poona College Of Pharmacy, Erandwane, Pune |
| 13 | 6812 | Progressive Education Society's Modern Institute of Business Studies, Nigdi, Pune |
| 14 | 6111 | Progressive Education Society's Modern Institute of Computer Application, Nigdi, Pune |
| 15 | 6358 | Sinhgad College of Pharmacy, Vadgaon, Pune |
| 16 | 6831 | D.Y. Patil School of Architecture, Pune |